आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२. २५६८६६९९

प्रति,

दि ०९/११/२०१७

**आदरणीय न्यायमूर्ती श्रीमती रोहिणी जी**

अध्यक्षा, इतर मागासवर्गीय वर्गांच्या उपवर्गीकरण चौकशी आयोग,
विज्ञान भवन, रूम नंबर २०९ नवी दिल्ली.

**महोदया,**

केंद्रीय मंत्रीमंडळाने नुकताच २३/८/२०१७ रोजी केंद्रीय ओ.बी.सी. साठीच्या २७% आरक्षणाचे विभाजन करण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी अत्यंत मागासलेले वर्ग, विमुक्त जमाती व भटक्या जमाती विविध लाभांपासून वंचित राहिल्या आहेत. त्यांना आजपर्यंत अन्य इतर मागासलेल्या वर्गांसाठीच्या आरक्षणाचे लाभ मिळाले नाहीत. आता त्यांना या निर्णयामुळे ते लाभ मिळतील.

अन्य मागासवर्गींयांच्या आरक्षणाचे विभाजन करण्यासाठी एका आयोगाची निर्मिती करण्यात आली असून हा आयोगाच्या अध्यक्षांची निवड झाल्या पासून तीन महिन्यांच्या आत आपल्या अहवाल सादर करील. हा आयोग "इतर मागास वर्गींयांचे उपवर्गीकरण चौकशी आयोग" या नावाने ओळखला जाईल. अन्य मागासवर्गीयांचे विभाजन अत्यंत मागासवर्गीय, भटके विमुक्त आणि परंपरागत व्यवसाय करणारे अशा घटकांची उपश्रेणी करावी अशी शिफारस हा आयोग करील. मागासवर्गीयांचे उप विभाजन करण्यासंदर्भात माननीय सर्वोच्य न्यायालयाने इंद्र सहानी विरूद्ध भारत सरकार या प्रकरणामधे माननीय सर्वोच्च न्यायालया ने इंद्र सहानी विरूद्ध भारत सरकार या प्रकरणामधे दिनांक १६/११/१९९२ रोजी असा निर्णय दिला आहे, की ओ.बी.सी. च्या २७% आरक्षणाचे विभाजन करता येईल. त्यात कायद्याची कोणतीही अडचण नाही. यापूर्वी भारतातील आंध्र प्रदेश, तेलंगाणा, पॉडेचरी, हरीयाणा, झारखंड, पश्चिम बंगाल, बिहार, तामिळनाडू आणि महाराष्ट्र या राज्यात भटके विमुक्त यांना वेगळे आरक्षण दिलेले आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच मंडळ आयोगाला जोडलेल्या श्री एल.आर.नायक यांच्या टिप्पणीनुसार व महाराष्ट्राच्या आरक्षणाच्या धर्तीवर २० वर्षांपूर्वी ९ ऑगस्ट,१९९७ रोजी पहिल्यांदी "बोंबाबोंब" मोर्चात आम्ही ही मागणी केली होती तेंव्हा पासून आम्ही या मागणीसाठी लढा देत आहोत. या लढयाची सुरूवात भाजपच्या श्री गोपीनाथ मुंडे यांच्या आर्शिवादाने झाले.

माननीय श्री एल.आर.नाईक यांनी मंडल आयोगाच्या अहवाला सोबत आपल्या मतभेद दर्शक टिप्पणीमधे आपले वेगळा विचार अत्यंत तळमळीने मांडले होते. त्यांच्या विचाराला उशीरा का होईना आता उजाळा देण्यात आला आहे. ही गोष्ट समाजाच्या वंचित घटकांना न्याय देण्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. याचे दूरगामी परिणाम होतील. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती श्री व्ही.ईश्वरैया यांना सुद्धा असे वाटते की ओ.बी.सी. यादीमधे उल्लेख केलेल्या जाती/वर्गांमधे साम्य असले तरीही त्या सर्व जाती व सर्व वर्ग एकाच सामाजिक वा शैक्षणीक पातळीवर नाहीत. अन्य मागासलेल्या वर्गांच्या यादीमधे अशा अनेक जनजाती आहेत की त्या सामाजिक व आर्थिक दृष्टीने फारच मागासलेल्या आहेत. अशा अनेक जाती जमाती आहेत की ज्या सामाजिक व आर्थिक अशा दृष्टीने अत्यंत मागासलेल्या असल्याने नजिकच्या भविष्यकाळात सर्वसामान्य जनतेमधे मिसळून जाऊ

आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

शकणार नाहीत. अशा जातींना आपण "दबले गेलेले मागासवर्ग असे म्हणू शकतो." या जाती "मागासलेल्या जातीतील मध्यम स्तरीय जमाती पेक्षा वेगळया असतील. अशा दबल्या गेलेल्या मागासवर्गीयांना प्रगती साधण्यासाठी व अधिक ज्ञान प्राप्त करण्यासाठी खूप वेळ लागेल कारण त्या अत्यंत मागासलेपणात रूतून बसल्या आहेत हे काम अत्यंत चतुरपणे केले पाहिजे व त्यासाठी या वर्गांना मुख्य ओ.बी.सी. च्या यादीतून वेगळे करून त्यांचा एक वेगळा गट केला पाहिजे.

**याबाबत आमची सूचना अशी आहे :-**

१) इतर मागासवर्गीय जातींमधे सामील केलेल्या विविध गटांनी प्राप्त केलेल्या आरक्षणाच्या फायद्यांच्या असमान वाटपाचे परीक्षण केले पाहिजे. हे परीक्षण केंद्रीय लोकसेवा परीक्षा आयोग घेत असलेल्या आय.ए.एस., आय.एफ.एस., आय.पी.एस., आय.आर.एस. व अन्य परीक्षामधे यशस्वी झालेल्या उमेदवारांच्या जातींच्या आधारे केले पाहिजे. तसेच ते कोणत्या राज्यांचे आहेत याचा ही अभ्यास केला पाहिजे.

२) लोकसभा, राज्यसभा यांची कार्यालये तसेच कृषी भवन, रेल भवन, विज्ञान भवन, परिवहन भवन, नीती आयोग, शास्त्रीभवन येथे असलेली कार्यालये यांच्या मानव संसाधन विभागांमधून खालील माहिती प्राप्त करावी.

(अ) या कार्यालयांमधे किती पदे आहेत ?

(ब) त्यामधे श्रेणी-१, श्रेणी-२, श्रेणी-३ व श्रेणी-४ ची किती किती पदे आहेत ?

(क) तेथील कर्मचाऱ्यांपैकी अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/अन्य मागासवर्गीय जाती/ खुला प्रवर्ग यातील जातीचे किती कर्मचारी आहेत ?

(ड) अन्य मागासवर्गीय कर्मचाऱ्यांमधे कोणत्या कोणत्या जातींचे कर्मचारी समाविष्ट आहेत ?

३) अन्य मागासवर्गीयांचे उपवर्गीकरण शास्त्रीय पद्धतीने व शास्त्रीय पायावर आधारीत केले पाहिजे. त्यामुळे आम्ही अशी सूचना करतो की अन्य मागासवर्गीय जातींचे ७ गटात उप वर्गीकरण केले पाहिजे व २७% आरक्षणाचे आबंटन या ७ गटांमधे त्या त्या गटांच्या लोकसंख्येच्या आधारे केले पाहिजे. अन्य मागासवर्गीयांच्या केंद्रीय यादीमधे समाविष्ट केलेल्या जातींचे राज्य निहाय उप वर्गीकरण खालील ७ गटांमधे करावे.

**१) विमुक्त जमाती**
**२) भटक्या जमाती**
**३) अर्ध भटक्या जमाती**
**४) पारंपारीक व्यवसाय करणाया व्यक्ती (बारा बलुतेदार)**
**५) अल्पसंख्याक मागासेल्या जाती**
**६) अत्यंत मागासलेल्या जाती**
**७) मागासलेल्या जाती**

आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

**स्पष्टीकरण :**

१) विमुक्त जमाती :- ब्रिटिश सरकारने गुन्हेगार म्हणून जाहीर केलेल्या जाती.

२) भटक्या जमाती :- या जमाती आपल्या उपजिवीकेसाठी सारख्या इकडून तिकडे भटकत असतात. यांची प्रवृत्ती भटकी असते.

३) अर्ध भटक्या जमाती :- या जमातीच्या व्यक्ती वर्षातील ४-६ महिने घराबाहेर जातात व मग घरी परत येतात. धनगर, पाल, गडेरिया व कोळी या गटामधे येतात.

४) पारंपारीक व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती :- या गटामधे खालील जातीच्या व्यक्ती येतात. न्हावी, शिंपी, कुंभार, लोहार, प्रजापती, बढई, सुतार, तेली, माळी, सैदी, सोनार इत्यादी.

५) अल्पसंख्याक मागासलेल्या जाती :- या जातींचा इतर मागासवर्गीयांच्या केंद्रीय सूचीमधे समावेश होतो. यामधे मुस्लीम, ख्रिश्चन, शीख व इतर संबंधित जातींचा समावेश होतो. या जाती इतर मागासवर्गी जातीच्या केंद्रीय सूचीमधे समाविष्ट केल्या असल्यामुळे त्यांचा या गटामधे समावेश करावा लागला.

६) अत्यंत मागासलेल्या जाती :- ज्या जाती वरील पाच गटात मोडत नाहीत व सातव्या गटातही त्यांचा समावेश करता येत नाही, त्यांचा समावेश या गटात होतो.

७) मागासलेल्या जाती :- ज्या जाती वरील पैकी कोणत्याही ६ गटात मोडत नाहीत त्या जातींचा या गटात समावेश होतो.

  १) भारत सरकारने एक कायदा पारित करून जाती निहाय जनगणना केली आहे. २७% आरक्षणाचे आबंटन या जनगणनेच्या आधारे करावे.

  २) उपवर्गीकरण शास्त्रीय आधाराने व शास्त्रीय पद्धतीने करण्यासाठी तसेच योग्य मापदंड व मानके ठरवण्यासाठी या माहितीचा खूप उपयोग होईल.

  ३) केंद्रीय यादीमधे समाविष्ट असलेल्या संबंधीत जाती, उपजाती, उपजमाती शोधून काढणे व त्यांचे वरील गटांमधे वर्गीकरण शोधणे ही माहीती राज्यांकडून मागवावी. काही उपजाती विविध नावांनी ओळखल्या जातात हे खरे आहे परंतु त्यांची मुख्य जाती एकच असते.

आम्ही उपरोक्त बाबींचा अगदी काळजीपूर्वक व सखोल अभ्यास केला आहे व त्याबाबत विचार केला आहे. आम्ही सामाजिक स्तरांवर काम करणाऱ्या विविध जातींचा मुख्य नेत्यांबरोबर या बाबींची चर्चा केली आहे आणि त्यानंतरच आम्ही अशी मागणी करीत आहोत की जर आयोगाला योग्य वाटत असेल तर आयोगाने आम्हाला सुनावणीला बोलवावे व आयोगाला आमच्या सेवांची आवश्यकता वाटली तर आम्ही आयोगाला आमच्या सेवा द्यायला तयार आहोत.

धन्यवाद !

**आपला,**

**हरिभाऊ राठोड**
**माजी खासदार तथा विधानपरिषद**
**भ्रमणध्वनी ८६५२४१४९९९**